# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

गोशाळेतील खोंडे गरजू शेतकऱ्यांना पाळावयास देणेबाबत.

१. सदरबाबतची माहिती, अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. अर्ज इकडील नमुन्यात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर शेतकऱ्याचे नाव व पूर्ण पत्ता आणि अर्ज खोंडे पाळावयास घेण्यासाठी भरलेला आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. अर्ज दि.२२/११/२०१७ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. उशिरा आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३. सदरकामी यापूर्वी केलेले अर्ज व अपूर्ण केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. अर्जासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, ७/१२ व ८अ उतारा इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

५. गोशाळेतील एकूण ३२ खोंडे पाळावयास देण्यात येत आहे. त्याचे वय अंदाजे १ ते ३ वर्षे आहे. या ३६ खोंडांच्या १८ जोडया करण्यात आलेल्या असून, प्राप्त अर्जातून चिट्टीद्वारे १८ गरजू / पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना खोंडे पाळावयास देण्यात येणार आहेत.

६. सदरची गोशाळेतील खोंडे गोशाळा विभाग, गणेश नगर, पंढरपूर येथे पाहावयास मिळतील.

७. कायमस्वरूपी गोपालनासाठी घेतलेली खोंडे यांची निगा, जोपासना योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यांना मुबलक प्रमाणात खाद्य देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

८. सदरची घेतलली खोंडे कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना विक्री अथवा इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

९. शेतकऱ्याने गोहत्या बंदी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची पुर्णता खबरदारी घेणे आवश्यक आहे.

१०. सदरची घेतलेली खोंडांचे पालन पोषणाचे वेळी त्यांचे पशुखाद्य, चारा, वैरण तसेच वेळोवेळी औषधोपचार इ. मध्ये कोणत्याही प्रकारची हयगय करता येणार नाही.

११. सदरची खोंडे शेतकऱ्यांना कायमस्वरूपी पाळावयास देण्यात येत असल्याने मंदिर समितीचे पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी केंव्हाही येऊन या खोंडांची पाहणी करतील. त्यावेळी त्यांना खोंडे दाखवणे आवश्यक आहे.

१२. सदरची खोंडे जीवंत असलेबाबत व सुस्थितीत असलेबाबत शेतकऱ्यांला दरवर्षी जुन महिन्यात मंदिर समितीला लेखी पत्राने कळविणे आवश्यक आहे. तसेच एखादे खोंड मयत झाल्यास तात्काळ मंदिर समितीला कळविणे बंधनकारक राहील.

१३. पालन करण्यासाठी घेतलेल्या खोंडांचे भविष्यात परिस्थितीने पालन करणे शक्य होत नसल्यास ती अन्य गरजु व्यक्तीस हस्तांतर करावयाचे झालेस, मंदिर समितीची पूर्व परवागनी घेणे माझ्यावर बंधनकारक राहील.

१४. सदरच्या खोंडांचा वापर फक्त शेतीकामासाठी करणे आवश्यक आहे.

१५. सदरच्या खोंडांचा वापर व्यवसायासाठी केल्यास समितीकडील योग्य ती कारवाई करण्यात येईल.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते शेतकऱ्यास बंधनकारक राहतील.

१७. ज्या शेतकऱ्यांना खोंडे देण्यात येतील त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१८. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

———//———

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**अर्ज**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– गोशाळेतील खोंडे पाळावयास मिळणेबाबत विनंती.

पूर्ण नाव :– श्री.–––––––––––––––––––––––––––––

पूर्ण पत्ता :– ––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––

मोबाईल कं.:– ––––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने गोशाळेतील खोंडे पाळावयास देण्याबाबतच्या दि.१४/११/२०१७ रोजीचे दैनिक दिव्यमराठी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीरातीप्रमाणे मला माझ्या शेतीकामासाठी दोन खोंडाची जोडी पाळावयास घेणे आवश्यक आहे.

त्याबाबत मंदिर समितीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. तसेच त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देण्यास तयार आहे. त्यानुसार मला खोंडाची जोडी पाळावयास मिळावी ही, नम्र विनंती आहे.

दिनांक /११/२०१७ शेतकऱ्याची स्वाक्षरी

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)

२. जमिनीचा ७/१२ उतारा व ८अ.